| | | |
|---|---|---|
| | **सायबर सेल, पिंपरी चिंचवड**<br>**पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,**<br>**प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे**<br>**दुरध्वनी क्रंमाक ०२०-२७३५०१२०** | |
| **प्रेसनोट** | **पिंपरी चिंचवड** | **दिनांक - २८/०९/२०२४** |


# सीबीआय अधिकारी व बँक अधिकारी असल्याचे सांगुन ६० वर्षीय इसमास अटकेची भिती घालुन १,०८,००,०००/- रु. ची फसवणुक करणारे अलवर,राजस्थान येथील आरोपीस जयपुर येथुन पिंपरी चिंचवड सायबर कडुन अटक

चिंचवड येथे राहणाऱ्या इसमास आरोपींनी व्हॉट्सअ‍ॅपद्वारे व्हिडीओ कॉल करुन एसबीआय कस्टमर सर्व्हिसेस तसेच मुंबई पोलीसचा ड्रेस घालुन सीबीआय अधिकारी व बँक अधिकारी असल्याबाबत तोतयागिरी करुन मनी लाँडरींगचे २.५ कोटी रुपयांचे फ्रॉड केसमध्ये अटक करण्याची भिती घातली व त्यांचे बँक खात्यातील रक्कम डिजीटल करन्सी चेक करुन ती व्हेरिफाय करुन परत करतो असे सांगुन, तक्रारदार इसमाचा विश्वास संपादन करुन तसेच जबरदस्तीने व अप्रामाणिकपणाने एकुण- १,०८,००,०००/-रुपये रक्कम सुपुर्द करण्यास भाग पाडुन आर्थिक फसवणुक केली म्हणुन तक्रारदार इसमानी प्रथम ऑनलाइन पोर्टलवर व त्यानंतर चिंचवड पोलीस ठाणे येथे संबंधिताविरुध्द तक्राद दिल्याने चिंचवड पोलीस ठाणे गु.र.नं. ३५८/२०२४ भा.न्या.सं. कलम-२०५, ३०८(१), ३१६(२), ३१८(४), ३१९(२), ३३६(३), माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(सी), ६६(डी) प्रमाणे फिर्याद दाखल आहे.

सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा. पोलीस आयुक्त, श्री. विनयकुमार चौबे यांनी अशा प्रकारचे गंभीर स्वरुपांचे गुन्हयांना प्रतिबध होणेकामी सदर गुन्हयाचा सखोल तपास करुन गुन्हा उघडकीस आणुन आरोपी अटक करणेकामी सायबर सेल यांनी तपास करणेबाबत आदेशीत केले होते. त्याप्रमाणे मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री. संदीप डोईफोडे, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. डॉ. विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर सेलचे पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे हे गुन्हयाचा तपास करीत असुन त्यांनी गुन्हयाचे तपासकामी सपोनि. प्रविण स्वामी व पोउनि. सागर पोमण यांचे दोन पथकाची नेमणुक करुन गुन्हयाचे तपासाबाबत मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे तपास करुन आरोपींनी गुन्हयात वापरलेले डीबीएस बँक अकाऊंट नं. ८८३०२१००००००८८८४ या अकाऊंटधारकांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने सपोनि प्रविण स्वामी, पोउपनि सागर पोमण सोबत पोलीस अंमलदार हेमंत खरात, श्रीकांत कबुले, संदिप टेकाळे, निलेश देशमुख यांचे पथकाने सदर कंपनीचे दोन भागीदार नामे - १) साहील मोहन मुदलियार वय २५ वर्षे रा. सर्वे नं. ७६ ते ८१, प्लॉट नं. ३७६ किरण सोसायटी, सहकारनगर, पुणे २) क्षितीज गिरीश क्षिरसागर वय २७ वर्षे रा. स. नं. १४/१५/२/१, लिला पार्क- ए-१, सिंहगड रोड, वडगांव बु, पुणे व त्यांचा साथीदार नामे ३) ओंकार राम नाईक वय २८ वर्षे, रा. सर्वोदय चौक, वडार कॉलनी, विलींग्डन कॉलेज, सांगली यांचा शोध घेवुन त्यांना गुन्हयात यापुर्वी अटक करण्यात आली होती.

त्यानंतर त्यांचेकडे केले तपासामध्ये व तांत्रिक तपासामध्ये गुन्हयातील फसवणुकीची रक्कम ही गुजरात, राजस्थान याभागात जात असल्याची व त्यांचे साथीदार हे गुजरात, राजस्थान येथील असल्याची माहीती मिळाल्याने वरिष्ठांचे परवागनीने सपोनि. प्रविण स्वामी, पोलीस अंमलदार अतुल लोखंडे, श्रीकांत कबुले, सौरभ घाटे यांचे पथक तात्काळ गुजरात, राजस्थान येथे रवाना केले. त्याप्रमाणे त्यांनी अथक परिश्रम व कौशल्यपुर्वक तपास करुन ऑनलाईन गुन्हे करण्यासाठी कुप्रसिध्द असलेले अलवर, राजस्थान येथील आरोपी नामे **मयंक अशोककुमार गोयल वय २० वर्षे, रा. वार्ड नं -१५, गुर्जर मोहल्ला, खेरली गंज, खेरली रेल, रुरल, अलवर, राजस्थान यास जयपुर राज्य - राजस्थान येथुन ताब्यात घेवुन दि. २७/०९/२०२४ रोजी १०.१६ वा. अटक केली आहे.** त्याची जयपुर येथील न्यायालयातुन ट्रान्झिट रिमांड घेवुन त्यास मा. पिंपरी न्यायालयात हजर करण्यात आले असता मा. न्यायाल यांनी त्याची दि. ०३/१०/२०२४ रोजीपर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे. त्याचेकडे गुन्हा करण्यासाठी वापरलेले बँक अकाउंट, त्यामधील व्यवहार, इतर साथीदार, त्याचा अशा प्रकारे किती गुन्हयामध्ये सहभाग आहे, इत्यादीबाबत तपास चालु आहे.

सदरची कारवाई मा. विनयकुमार चौबे - पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. डॉ. शशिकांत महावरकर - सह पोलीस आयुक्त, मा. वसंत परदेशी - अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. संदिप डोईफोडे - पोलीस उपआयुक्त, गुन्हे, मा. डॉ. विशाल हिरे - सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे १ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे, सपोनि. प्रविण स्वामी, पोउपनि. सागर पोमण, पोलीस अंमलदार अतुल लोखंडे,श्रीकांत कबुले, सौरभ घाटे, हेमंत खरात, दिपक भोसले, संदिप टेकाळे, निलेश देशमुख, मुकुंद लोटके, दिपक माने सर्व नेमणुक सायबर सेल यांच्या पथकाने केली आहे.

**नागरीकांना आवाहन** - अशा प्रकारे येणा-या फसव्या फोनला घाबरुन जाऊ नये तसेच अनोळखी कॉलवर विश्वास न ठेवता नजीकच्या पोलीस ठाण्यात जाऊन खात्री करुन घ्यावी. पोलीस अशा प्रकारे कोणालाही फोन करत नाहीत अगर डिजीटल अरेस्टची भिती घालत नाहीत. कोणत्याही परिस्थितीत आपला मोबाईल स्क्रिन, वैयक्तीक माहीती शेअर करु नये.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,
पिंपरी चिंचवड.